!! श्री !!

शिवसेना

**खासदार चंद्रकांत खैरे**

**शिवसेना उपनेते**

जा.क्र. : खा.का.प्र.प ४० २ २७/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# दौलताबादला पर्यायी वळण रस्ता तयार करा

## खासदार चंद्रकांत खैरे यांचे नितिन गडकरी यांना निवेदन

**बायपासचा प्रस्ताव मंजुर करुन या आर्थिक वर्षात समावेश करण्याच्या केंद्रियमंत्री नितीन गडकरी यांच्या सुचना**

**नवी दिल्ली (ता.२७) :** सोलापूर-संभाजीनगर- धुळे- २११ राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या ऐतिहासिक दौलताबाद किल्ला परीसरात वाहतुकींची होणारी कोंडी फोंडण्यासाठी संभाजीनगर-दौलताबाद-वेरुळ बायपास करण्यात यावा, अशी मागणी करणारे निवेदन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केंद्रीय वाहतूकमंत्री नितिन गडकरी यांना दिले आहे. या संबंधी राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या प्रस्तावाला बायपासचा प्रस्ताव या वर्षीच्या अहवालात जोडण्याच्या केंद्रिय दळववळणमंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. या निवेदनात वेरुळचे घृष्णेश्वर मंदीर, लेण्या पाहण्यासाठी देश-विदेशातील पर्यटकांना या वाहतुक कोंडीचा फटका बसत असण्याकडे ही खासदार चंद्रकांत खैरे यांच्या निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे.

सोलापूर-संभाजीनगर-धुळे या राष्ट्रीय महामार्गार संभाजीनगर ते धुळे दरम्यान अनेक ऐतिहासीक वस्तू वसलेल्या आहेत. यामध्ये दौलताबादचा ऐतिहासीक किल्ला, वेरूळच्या जगप्रसिध्द लेण्या आणि घृष्णेश्वरांचे मंदीरासह भद्रा मारोती, सुलीभंजन परीसर याच मार्गावर आहे. सर्व धर्मीयांचे देवस्थान आणि श्रध्दास्थाने असल्यामुळे या परीसरात देश- विदेशातील पर्यटक, भाविकांसह स्थानिक जिल्ह्यातील लोकही याच मार्गारून जात असतात. मात्र दौलताबाद किल्ला परीसरात असलेल्या किल्ल्यातील प्रवेशद्वारातून राष्ट्रीय महामार्ग जातो. हा मार्ग दोन लेणचा आहे. हे ऐतिहासिक प्रवेशव्दार अरुंद असल्यामुळे प्रवेद्वार परीसरात ट्रक आणि पर्यटकांच्या गाड्यांच्या चार किलोमिटर पर्यत रांगा लागलेल्या असतात. यामध्ये पर्यटकांना आपला बहूमुल्य असा वेळ घालवावा लागतो. तसेच ही वाहतूकीची कोंडी फोंडण्यासाठी तीन-चार तास लागतात. यामुळे सध्या राष्ट्रीय रस्ते प्राधिकरणाकडून सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणचे काम सुरु करण्यात आलेले आहे. तेव्हा या चारपदरी रस्ता रूंदीकरणामध्ये दौलताबाद परीसरात बायपास (बाह्य वळण) रस्त्याची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी परीसरातील नागरीकांची आहे. ही मागणी मान्य न झाल्यास परीसरात येणाऱ्या पर्यटकांवर परीणाम होण्याची भिती असल्याचे निवेदन खासदार चंद्रकांत खैरे यांनी केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांना दिले आहे.

दौलताबाद किल्याची तटबंदी रुंदीकरणात येत असल्याने पुरातत्व विभागाकडून रुंदीकरणासाठी परवानगी मिळणार नसल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हा महत्वकांक्षी सोलापुर-संभाजीनगर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ पूर्णत्वास नेण्यासाठी प्रस्तावित साडे तीन किलो मीटर बायपासच्या निर्मीतीसाठी २१ कोटी १९ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, याचा सविस्तर प्रस्ताव यापुर्वी राष्ट्रीय रस्ते प्राधिकरणला देण्यात आला असल्याकडेही नितिन गडकरी यांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

**बायपासची तात्काळ पाहणी करण्याचे आदेश**

दौलताबाद गावाजवळ देश-विदेशी पर्यटकांची होणारी हेळसांड थांबविण्यासाठी बायपास निर्मिती करण्यासाठी राष्ट्रीय रस्ते प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ जागेची पाहणी करण्याचे आदेश केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी दिले आहे. तसेच बायपासचा प्रस्ताव मुळ प्रस्तावाला जोडत यावर्षीच्या वार्षिक अहवालास जोडण्याचे आदेश ही गडकरी यांनी दिले आहेत. यामुळे प्राधिकरणाचे अधिकारी उद्या, शनिवारी खासदार खैरे यांच्या समवेत बायपासची पाहणी करणार असून, मागिल अनेक वर्षापासून बायपासची प्रलंबित असलेली मागणी मार्गी लागणार असुन दौलताबाद घाटाची वाहतुक कोंडीतुन पर्यटक व नागरिकांची सुटका होईल असे ही शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525